महाराष्ट्र शासन

## ग्राम विकास विभाग


**संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण यांचे कार्यालय**

**४ था मजला, दक्षिण कक्ष, सिडको भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४**

टोल फ्री क्र. २२२१८०० ०१९ Website : www.mahaawaas.org

दूरध्वनी क्र. २७५६१८२४-०२२ MahaAwaasEmail: directoriayruralhousing@gmail.com


**क्र. राव्यक-ग्रागृ/प्रआयो-ग्रा-२/ २५ /कार्यपध्दती-२०२६** **दि. ०८/०१/२०२६.**

प्रति,

कार्यकारी अध्यक्ष,
जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,
तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, सर्व.

**विषय : <u>प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण (PMAY-G) टप्पा-२ व सन २०२४-२५ मध्ये उद्दिष्ट मिळालेल्या राज्य पुरस्कृत आवास योजनांतर्गत लाभार्थ्यांच्या घरावर सौर यंत्रणा बसविण्याबाबत.</u>**

संदर्भ :
१. ग्रामविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्र.प्रआयो-२०२५/ प्र.क्र.०४/योजना-१०, दि.०४.०४.२०२५.
२. मा.प्रधान सचिव, ग्रामविकास व पंचायतराज विभाग यांच्या अध्यक्षतेखाली व्हिसीद्वारे दि.०९ ऑक्टोबर, २०२५ रोजी झालेली आढावा बैठक .
३. जिल्ह्यांना उपलब्ध करून दिलेली महावितरणकडून प्राप्त झालेली वेंडर/पुरवठादार यांची यादी दि.१६.१०.२०२५.
४. मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियानांतर्गत ऑक्टोबर ते डिसेंबर २०२५ या कालावधीत दिलेल्या क्षेत्रिय भेटी व जिल्हा आढावा बैठका.
५. मा.प्रधान सचिव, ग्रामविकास व पंचायतराज विभाग यांच्या अध्यक्षतेखाली व्हिसीद्वारे दि.०४ डिसेंबर, २०२५ रोजी झालेली आढावा बैठक.
६. मा.प्रधान सचिव, ग्रामविकास व पंचायतराज विभाग यांच्या अध्यक्षतेखाली व्हिसीद्वारे दि.०२ जानेवारी, २०२६ रोजी झालेली आढावा बैठक.
७. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांचे दि.०८.०१.२०२६ रोजी प्राप्त झालेले निर्देश.

सद्यस्थितीत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत घरकुल बांधकामाकरिता रु. १,२०,०००/- अर्थसहाय्य अनुज्ञेय आहे. या व्यतिरिक्त मनरेगा अंतर्गत ९० दिवस अकुशल मजुरी साधारणपणे रक्कम रु.२८,०८०/- , स्वच्छ भारत मिशन अंतर्गत रु.१२,०००/- अर्थसहाय्य अनुज्ञेय आहे. संदर्भ क्र. १ अन्वये शासन निर्णय दि. ०४.०४.२०२५ नुसार राज्य हिश्श्यातून घरकुल बांधकामासाठी अतिरिक्त अनुदान रु.३५,०००/- व प्रधानमंत्री सुर्यघर योजनेतून छतावर १ KW मर्यादेपर्यंत सौर ऊर्जा यंत्रणा उभारणी करिता केंद्र शासनाकडून मिळणाऱ्या अनुदाना व्यतिरिक्त रु.१५,०००/- असे एकूण रु.५०,०००/- अर्थसहाय्य देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यानुसार प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण (PMAY-G) टप्पा-२ व सन २०२४-२५ मध्ये उद्दिष्ट

मिळालेल्या राज्य पुरस्कृत आवास योजनांतर्गत लाभार्थ्यांसाठी PM सुर्यघर योजनेंतर्गत रु.१५,०००/- अनुज्ञेय आहे.

त्यानुषंगाने संदर्भ क्र.२ अन्वये सदर विषयाबाबतची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने महावितरण (MSEDCL) यांनी सादरीकरण करुन याबाबत सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना मार्गदर्शन केले आहे. तसेच सदर बैठकीत दिलेल्या सूचनेनुसार महावितरण (MSEDCL) यांचेकडून सौर संच स्थापित करण्यासाठी नोंदणीकृत वेंडर/पुरवठादार यांची प्राप्त यादी जिल्ह्यांना संदर्भ क्र.३ अन्वये दि.१६ /१०/२०२५ रोजी उपलब्ध करून देण्यात आली आहे.

संदर्भ क्र.४ अन्वये मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियानांतर्गत ग्रामीण गृहनिर्माण उपक्रमांचा आढावा घेण्यासाठी आयोजित केलेल्या क्षेत्रिय भेटी व जिल्हास्तरीय आढावा बैठकांमध्ये याबाबत आढावा घेण्यात आला असून महावितरणच्या वेंडर बरोबरच्या बैठका घेऊन पुढील कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. संदर्भ क्र.५ अन्वये जिल्हास्तरावर आयोजित वेंडर/पुरवठादार यांच्या बैठका व त्यानुसार करावयाची पुढील कार्यवाही याबाबत पुन:श्च निर्देश देण्यात आलेले आहेत.

संदर्भ क्र.६ अन्वये झालेल्या आढावा बैठकीमध्ये सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना पूर्ण झालेल्या घरकुलांवर सौर ऊर्जा प्रणाली (Solar Rooftop System) तात्काळ बसविण्याबाबतच्या कार्यवाहीचा नियमित आढावा घेण्याचे सूचित करण्यात आलेले आहे. संदर्भ क्र ७ अन्वये मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांनी देखील सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना याबाबत निर्देश दिले आहेत.

**त्यानुषंगाने पूर्ण झालेल्या घरकुलांवर सौर ऊर्जा प्रणाली (Solar Rooftop System) बसविण्याबाबत खालीलप्रमाणे कार्यपध्दती अवलंबण्यात यावी.**

१. पूर्ण झालेल्या घरकुलांना महावितरणचे विदयुत जोडणी झालेली आहे. याची खात्री करण्यात यावी.
२. तद्नंतर https://pmsuryaghar.gov.in या संकेतस्थळाला भेट देऊन राष्ट्रीय पोर्टलवर लाभार्थ्यांची ऑनलाइन नोंदणी करण्यात यावी.
३. ऑनलाइन नोंदणी केल्यानंतर महावितरण (MSEDCL) मार्फत पडताळणी करून Feasibility Approval प्राप्त करून घेण्यात यावे.
४. पडताळणी नंतर मंजूरी मिळाल्यावर पोर्टलवर उपलब्ध असलेल्या नोंदणीकृत (Empanelled) विक्रेत्यांमधून निवड करण्यात यावी.
५. त्यानंतर निवडलेला नोंदणीकृत विक्रेत्याकडून घरावर सौर संच स्थापित करून घेण्यात यावे. **या प्रकरणी PM सुर्यघर योजनेंतर्गत सौर संच स्थापित करण्याकरिता येणारा खर्च हा अगोदर करावा लागतो व त्यानंतर अनुदान प्राप्त होते. त्यानुषंगाने रुफ टॉप सोलार संच बसवण्याच्या दृष्टीने खालील पर्यायांचा अवलंब करता येवू शकेल.**

अ) सौर संच स्थापित करण्याकरीता करावयाचा खर्च करण्यासाठी लाभार्थ्यांना प्रोत्साहीत करुन महावितरणाच्या वेंडर/पुरवठादार यांचे मदतीने सौर संच स्थापित करून घ्यावे. व तद्नंतर केंद्राचे व राज्याचे अनुदान लाभार्थ्यास प्राप्त होईल.

ब) लाभार्थी प्रथम खर्च करण्यास तयार नसेल, तर महावितरणाच्या वेंडरला सदर गुंतवणूक करण्यासाठी प्रोत्साहीत करावे. या परिस्थितीत लाभार्थी, बँक व वेंडर/पुरवठादार यांचेमध्ये त्रिपक्षीय करार करून सौर संच स्थापित (Installation) केल्यानंतर अनुदान प्राप्त झाल्यानंतर संबंधित वेंडर/पुरवठादारास सदर रक्कम अदा करण्याची कार्यवाही करण्यात यावी.

क) लाभार्थी प्रथम खर्च करण्यास तयार नसेल अथवा महावितरणचे वेंडर/पुरवठादार गुंतवणूक करण्यास इच्छुक नसेल, तर लाभार्थ्यांना बँकेचे कर्जप्रकरण करण्यास प्रोत्साहीत करून लाभार्थी, बँक व महावितरणचे वेंडर/पुरवठादार यांचेमध्ये त्रिपक्षीय करार करून सौर संच स्थापित (Installation) करण्यात यावे.

ड) याबाबत बँक व्यतिरिक्त राष्ट्रीय ग्रामीण उपजीविका अभियान (NRLM) अंतर्गत स्वयंसहाय्यतागट /ग्राम संघ/प्रभाग संघ यांचे CIF (Community Investment Fund) मधून बिनव्याजी/कमी व्याजदराचे कर्ज उपलब्ध करणे शक्य आहे. **उदा.** कोल्हापूर व वर्धा जिल्ह्यामध्ये याप्रमाणे कार्यवाहीकरण्यात येत आहे. त्याचा अवलंब इतरही जिल्ह्यामध्ये करता येवु शकेल.

इ) CSR निधी किंवा इतर नाविण्यपूर्ण उपक्रमाच्या माध्यमातून सौर संच स्थापित करण्याबाबत प्रयत्न करावा.

६. घरावर सौर संच स्थापित झाल्यावर किंवा इन्स्टॉलेशन प्रक्रिया सुरू असताना नेट मीटरसाठी कार्यवाही करण्यात यावी.

७. उपरोक्त कार्यवाही पूर्ण झालेनंतर प्रधानमंत्री सूर्यघर योजनेंतर्गत 1 Kw क्षमतेसाठी केंद्रशासनाचे देय अनुदान रु. 30,000 /- व राज्य शासनाच्या दि. 04.04.2025 च्या शासन निर्णयानुसार देय अनुदान रु. 15,000 /- लाभार्थ्यांना देण्याबाबत पुढील कार्यवाही करण्यात यावी.

तरी प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण (PMAY-G) टप्पा-२ व सन २०२४-२५ मध्ये उद्दिष्ट मिळालेल्या राज्य पुरस्कृत आवास योजनांतर्गत लाभार्थ्यांसाठी PM सुर्यघर योजनेचा लाभ देण्यासाठी उपरोक्त प्रमाणे कार्यवाही करावी. हे करतांना जिल्हा स्तरावर व तालुका स्तरावर महावितरणच्या वेंडर सोबत तातडीने बैठका घेऊन पूर्ण झालेल्या घरकुलांवर प्रत्यक्षात सौर यंत्रणा बसविण्याच्या कामास गती द्यावी.

**(एकनाथ डवले, भा.प्र.से.)**
**प्रधान सचिव**
**ग्रामविकास व पंचायतराज विभाग**

**प्रत** : १. विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, सर्व यांना माहितीस्तव.
२. संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, नवी मुंबई यांना माहितीस्तव.
३. श्री. प्रसाद रेशमे, संचालक, महावितरण (MSEDCL), मुंबई यांना माहितीस्तव.
४.अतिरिक्त विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, सर्व यांना माहिती व कार्यवाहीसाठी.
५. प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, सर्व यांना माहिती व कार्यवाहीसाठी.